# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४०, १४१, १४२/२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्रीमती बौंराव्वा गुरुलींग मुचंडी, ( केस क्र. १४०/२०१० )<br>मु.पो. सोन्याळ, जत, जि. सांगली<br><br>२) श्री. हणमंत नंद्याप्पा पुजारी, ( केस क्र. १४१/२०१० )<br>मु.पो. सोन्याळ, जत, जि. सांगली<br><br>३) श्रीमती बंगारव्वा हणमंत दलवाई, ( केस क्र. १४२/२०१० )<br>मु.पो. सोन्याळ, जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

या तिन्ही तक्रारींमध्ये सामनेवाला पक्ष एकच म्हणजे विद्युत वितरण कंपनी आहे व तक्रारीमध्ये उपस्थित केलेले मुद्दे समान आहेत. मंचाकडून अपेक्षित मागणी समान आहे. तक्रारदाराचे प्रतिनिधी व वि.प.चे अधिकारी यांचे संमत्तीने तिन्ही तक्रारी एकत्रित निकाली काढणेत येत आहेत.

१) <u>केस क्र. १४०/२०१०</u>

श्रीमती बौंराव्वा गुरुलींग मुचंडी, मु.पो. सोन्याळ, जत, जि. सांगली यांनी आपली शेती जमीन गट क्र. ५७० मध्ये ३ अश्वशक्ती वीज पुरवठा मिळणेसाठी वि.प.कडे अर्ज करुन पावती क्र. ५३२९७०८ नुसार चलनाप्रमाणे रु. ४०००/– दि. ४.१२.२००९ ला भरले. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १.१.२०१० रोजी अर्ज केला. अंतर्गत कक्षाने दि. २०.५.२०१० ला आदेश केले त्यामध्ये विलंब झालेस तक्रारदारास द्यावयाच्या भरपाई बाबत निर्देशित करण्यात आले. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार अंतर्गत कक्षाने दोन महिन्यात कोणतेही आदेश पारित न केलेने जत तालुका विद्युत धारक असोसिएशन, जत यांनी कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग यांचेशी चर्चा केली. त्यानुसार सहाय्यक अभियंता, संख यांना दि. ४.३.२०१० रोजी पत्र दिले. त्यानुसार तक्रारदार यांनी दि. ९.३.२०१० ला संख उप विभाग कार्यालयास चाचणी अहवाल दिला आहे. वाहिनी विस्तार असलेने तक्रारदार यांस ३ महिन्याचे आंत म्हणजे दि. ८.६.२०१० पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे कायदेशीर होते. अद्याप वीज पुरवठा मिळाला नाही. तक्रारदार यांनी विद्युत पुरवठा मिळावा व झालेल्या विलंबापोटी विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १९.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. ४.१२.२००९ ला अनामत रक्कम भरल्याचे मान्य केले आहे. चाचणी अहवाल दि. ९.३२०१० रोजी दिलेला आहे. जागेची संयुक्त तपासणी केली असतां संच मांडणी, मोटर व मोटर पेटी जागेवर नव्हती. संच मांडणी व मोटर मोटर पेटी बसविल्यानंतर व चाचणी अहवाल दिल्यानंतर वितरण कंपनीच्या नियमानुसार वीज जोडणी देण्यात येईल.

२) <u>केस क्र. १४१/२०१०</u>

श्री. हणमंत नंद्याप्पा पुजारी, मु.पो. सोन्याळ, जत, जि. सांगली यांनी आपली शेती जमीन गट क्र. ११२८ मध्ये ३ अश्वशक्ती वीज पुरवठा मिळणेसाठी वि.प.कडे अर्ज करुन पावती क्र. ५३२३४६२ नुसार चलनाप्रमाणे रु. ४०००/– दि. १४.१०.२००९ रोजी भरले. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १.१.२०१० रोजी अर्ज केला. अंतर्गत कक्षाने दि. २०.५.२०१० ला आदेश केले त्यामध्ये विलंब झालेस तक्रारदारास द्यावयाच्या भरपाई बाबत निर्देशित करण्यात आले. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार अंतर्गत कक्षाने दोन महिन्यात कोणतेही आदेश पारित न केलेने जत तालुका विद्युत धारक असोसिएशन, जत यांनी कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग यांचेशी चर्चा केली. त्यानुसार सहाय्यक अभियंता, संख यांना दि. ४.३.२०१० रोजी पत्र दिले. त्यानुसार तक्रारदार यांनी दि. ९.३.२०१० ला संख उप विभाग कार्यालयास चाचणी अहवाल दिला आहे. वाहिनी विस्तार असलेने तक्रारदार यांस ३ महिन्याचे आंत म्हणजे दि. ८.६.२०१० पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे कायदेशीर होते. अद्याप वीज पुरवठा मिळाला नाही तक्रारदार यांनी विद्युत पुरवठा मिळावा व झालेल्या विलंबापोटी विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २७.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. ४.१२.२००९ ला अनामत रक्कम भरल्याचे मान्य केले आहे. चाचणी अहवाल दि. ९.३२०१० रोजी दिलेला आहे. जागेची संयुक्त तपासणी केली असतां संच मांडणी, मोटर व मोटर पेटी जागेवर नव्हती. संच मांडणी व मोटर मोटर पेटी बसविल्यानंतर व चाचणी अहवाल दिल्यानंतर वितरण कंपनीच्या नियमानुसार वीज जोडणी देण्यात येईल.

३) <u>केस क्र. १४२/२०१०</u>

श्रीमती बंगारव्वा हणमंत दलवाई, मु.पो. सोन्याळ, जत, जि. सांगली यांनी आपली शेती जमीन गट क्र. ७५/१ १ मध्ये ३ अश्वशक्ती वीज पुरवठा मिळणेसाठी वि.प.कडे अर्ज करुन पावती क्र. ५३२९७०७ नुसार चलनाप्रमाणे रु. ४०००/– दि. ४.१२.२००९ रोजी भरले. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १.१.२०१० रोजी अर्ज केला. अंतर्गत कक्षाने दि. २०.५.२०१० ला आदेश केले त्यामध्ये विलंब झालेस तक्रारदारास द्यावयाच्या भरपाई बाबत निर्देशित करण्यात आले. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार अंतर्गत कक्षाने दोन महिन्यात कोणतेही आदेश पारित न केलेने जत तालुका विद्युत धारक असोसिएशन, जत यांनी कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग यांचेशी चर्चा केली. त्यानुसार सहाय्यक अभियंता, संख यांना दि. ४.३.२०१० रोजी पत्र दिले. त्यानुसार तक्रारदार यांनी दि. ९.३.२०१० ला संख उप विभाग कार्यालयास चाचणी अहवाल दिला आहे. वाहिनी विस्तार असलेने तक्रारदार यांस ३ महिन्याचे आंत म्हणजे दि. ८.६.२०१० पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे कायदेशीर होते. अद्याप वीज पुरवठा मिळाला नाही. तक्रारदार यांनी विद्युत पुरवठा मिळावा व झालेल्या विलंबापोटी विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १९.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. ४.१२.२००९ ला अनामत रक्कम भरल्याचे मान्य केले आहे. चाचणी अहवाल दि. ९.३.२०१० रोजी दिलेला आहे. जागेची संयुक्त तपासणी केली असतां संच मांडणी मोटर व मोटर पेटी जागेवर नव्हती. संच मांडणी व मोटर मोटर पेटी बसविल्यानंतर व चाचणी अहवाल दिल्यानंतर वितरण कंपनीच्या नियमानुसार वीज जोडणी देण्यात येईल.

प्रस्तुतच्या तक्रारीत मंचाकडून अपेक्षित मदत/ मागणी – वितरण वाहिनीचा विस्तार असलेने विद्युत पुरवठा दि. ८.६.२०१० पर्यंत मिळणे जरुरी होते. त्यामुळे विद्युत पुरवठा मिळावा व झालेल्या विलंबाबद्दल विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी. तक्रारी प्रतिनिधी श्री. खापरे मार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १९.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदारांनी दि ४.१२.२०१० रोजी अनामत रक्कम भरल्याचे मान्य केले आहे व दि. ९.३.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला आहे. परंतु जागेची पहाणी केली असतां संच मांडणी (मोटर व मोटर पेटी) जागेवर नव्हती. संच मांडणी केल्यावर व चाचणी अहवाल दिल्यानंतर वि.प.च्या नियमानुसार वीज कनेक्शन देण्यात येईल. अहवालासोबत संयुक्त तपासणी अहवालाची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

या तक्रारींची सुनावणी मंचासमोर दि. २८.७.२०१० ला घेण्यात आली. तक्रारदार प्रतिनिधी खापरे उपस्थित. वि.प.तर्फे कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ श्री. भोसले, कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता व प्रभारी सहाय्यक अभियंता संख उप विभाग श्री. मैंलापुरे उपस्थित. श्री. खापरे यांचे म्हणण्यानुसार या तिन्ही तक्रारींमध्ये शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा मिळावी अशी मागणी आहे. वाहिनीचा विस्तार करुन विद्युत पुरवठा असलेने चलन मिळाल्यानंतर ३ महिन्यात विद्युत पुरवठा करणे कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वितरण कंपनीवर बंधनकारक आहे. या तिन्ही तक्रारींमध्ये तक्रारदार यांनी दि. ९.३.२०१० ला चाचणी अहवाल दिलेले आहेत. अंतर्गत कक्षाने दि. १.१.२०१० च्या तक्रारींवर २ महिन्याच्या मुदतीमध्ये आदेश दिलेले नाहीत ते २०.३.२०१० ला देण्यात आले, त्यामध्ये भरपाई देण्याबाबत आदेश झाले आहेत. श्री. खापरे यांनी वि.प.चे सप्लाय कोड चे कलम १३.१.१ मधील तरतुदीवर भर देवून संयुक्त तपासणी करणेपूर्वी ग्राहकास नोटीस देणे जरुरी होते असे सांगितले.

या तिन्ही तक्रारींमध्ये दि. १४.७.२०१० ला तपासणी केल्याचे अहवाल दिले आहेत. तक्रारदारांना नोटीस दिल्याचा कुठेही उल्लेख नाही. त्यामुळे वि.प.चे म्हणणे संचाची मांडणी केली नाही किंवा संयुक्त तपासणी अहवाल कायदेशीर आहे असे म्हणता येणार नाही. उलट, तो वितरण कंपनीच्या सप्लाय कोडच्या कलम १३.१.१ तरतुदीच्या विरुध्द आहे. मंचासमोर तोंडी म्हणणे देत असतांना, ग्राहक प्रतिनिधींनी लेखी तक्रार दि. २७.७.२०१० दाखल केली आहे व त्याची प्रत कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांना देण्यात आली आहे. त्यामध्ये वि.प.ने आपल्या लेखी अहवालात तक्रारदाराच्या जागेवर तपासणी केली असतां संच मांडणी नाही, मोटर व मोटर पेटी बसविलेली नाही. सदर बाबींची पूर्तता केल्यावर वि.प.च्या नियमाप्रमाणे विद्युत पुरवठा देण्यात येईल हे वि.प.ने स्वत: च्या चुका झाकण्यासाठी असे म्हटले आहे, कारण संयुक्त तपासणी केव्हा केली याचा उल्लेख नाही. कृती मानकानुसार विद्युत पुरवठा करण्याची मुदत संपल्यावर असे पत्र वि.प.ने दिले आहे. वि.प.ने विद्युत पुरवठा संहिताचे कलम १३.१.१ नुसार ग्राहकास नोटीस दिली होती काय ? किंवा ग्राहकाच्या ठेकेदाराला हजर राहणेस कळविले होते काय ? याचाही उल्लेख नाही. कोल्हापूर ग्राहक तक्रार निवारण मंचाने कांही प्रकरणां मधील तक्रारीत दिलेल्या आदेशानुसार वीज संच मांडणी अपुरी अथवा चुकीची अथवा मुळातच नसलेस वितरण कंपनीने हा चाचणी अहवाल देणाऱ्या शासनमान्य अनुज्ञाप्ती धारकावर महाराष्ट्र शासनाच्या विद्युत निरीक्षकांकडे योग्य ती लेखी तक्रार करुन त्यावर कायदेशीर कारवाई केली पाहिजे. या आदेशाचे पालन वितरण कंपनीने केले आहे काय ? याचा खुलासा वि.प.ने मंचाकडे करावा अशी मागणी केली आहे. शेवटच्या पॅरा क्र.११ मध्ये विद्युत वाहिनी तयार केलेनंतर जर एका महिन्यात ग्राहकाने वीज पुरवठा घेतला नाही व वितरण कंपनीने ग्राहकास तसे कळविले तर त्याचे किमान आकाराचे बिलींग चालू करण्याची तरतूद महावितरणच्या विद्युत पुरवठा संहितेत आहे, ही जाणीव वितरण कंपनीने ठेवणे गरजेचे आहे. वितरण कंपनीने मा. आयोगाच्या विनियमाच्या विरुध्द व मा. मंचाच्या आदेशाच्या विपरीत कृतीची गंभीर दखल घेवून त्या बाबत योग्य ती कारवाई व्हावी व ज्या ग्राहकांना मुदतीत वीज पुरवठा करणेस वि.प.स अपयश आलेले आहे, त्या ग्राहकांना कृती मानकानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी विनंती मंचाकडे केली आहे.

उत्तरामध्ये वि.प.तर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता यांनी विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. कृती मानकातील तरतुदीनुसार ३ महिन्यांत विद्युत पुरवठा देणे जरुरी होते हे मान्य केले परंतु विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. सप्लाय कोड कलम १३.१.१ नुसार संयुक्त तपासणीचेवेळी नोटीस द्यावी लागते या आक्षेपाबद्दल कांहीच उत्तर दिले नाही. परंतु वि.प.ने तक्रारदारांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर विद्युत पुरवठा देण्याची तयारी दर्शविली. ग्राहक भरपाई बाबत लेखी/ तोंडी कुठलेही स्पष्टीकरण वा कारणे दिली नाहीत.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) या तिन्ही तक्रारींमधील तक्रारदार यांना मागणी केल्याप्रमाणे विद्युत पुरवठा देण्याचे आदेश वि.प.स देणे योग्य होईला काय ?

उत्तर : होय

२) तक्रारदार हे विलंबापोटी भरपाई मिळणेस हक्कदार आहेत काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

वितरण कंपनीच्या लेखी/ तोंडी कथनानुसार या तिन्ही तक्रारींमध्ये तक्रारदार यांनी शेतीपंपासाठी ३ अश्वशक्ती विद्युत पुरवठा मिळण्यासाठी रु. २५०० + १५०० असे एकूण रु. ४०००/– वितरण कंपनीकडे जमा केल्याचे मान्य केले आहे. त्या पुष्ट्यर्थ पावती क्रमांक तक्रारदार यांनी दिल्याचे तोंडी मान्य केले. अंतर्गत कक्षाने २ महिन्यात आदेश दिले नाहीत परंतु ते १.१.२०१० च्या तक्रारींमध्ये दि. २०.३.२०१० ला दिले असून विलंब झाला असलेस भरपाई द्यावी असे आदेश दिले आहेत. वि.प.ने वीज जोडणी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर देण्याची तयारी दर्शविली, परंतु संच मांडणी (मोटर व मोटर पेटी बसविल्यानंतर) केल्यानंतर व  नवीन चाचणी अहवाल दिल्यानंतर अशी अट घातली आहे.

हे पहाण्यापर्वी तक्रारदार प्रतिनिधींनी केलेल्या कथनाचा परामर्श घेणे जरुरी आहे. विद्युत पुरवठा कायदा २००३ कलम ४३ नुसार

Every distribution licensee, shall, on an application by the owner or occupier of any premises, give supply of electricity to such premises, within one month after receipt of the application requiring such supply :

Provided that, where such supply requires extension of distribution mains, or commissioning of new sub-stations, the distribution licensee shall supply the electricity  to such premises immediately after such extension or commissioning or within such period as may be specified by the Appropriate Commission :

Provided further that, in case of a village or hamlet or area wherein no provision of supply of electricity exists, the Appropriate Commission may extend the said period as it may consider necessary for electrification of such village or hamlet or area.

या तिन्ही प्रकरणांमध्ये वि.प.कडे संबंधित एरियामध्ये विद्युत पुरवठा उपलब्ध असल्याने वि.प.तर्फे स्पष्ट होते. त्यामुळे उभयबाजूंना मान्य असल्याप्रमाणे वीज पुरवठ्यासाठी वाहिनीचा विस्तार असल्यामुळे मा. विद्युत नियामक आयोगाने मान्यता दिलेल्या अधिनियमानुसार मुदतीत विद्युत पुरवठा देणे जरुरी आहे अन्यथा ग्राहकास भरपाई देणे वितरण कंपनीची जबाबदारी आहे. त्यासाठी मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग(परवानेधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठ्याचा कालावधी व भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ मधील कलम ४.५

Where the supply of electricity to a  premises requires extension or augmentaiton of distributing mains, the Distribution Licensee shall give supply to such premises within three months from the date of receipt of complete application in accordance with the Maharashtra Electricity Regulatory Commission ( Electricity Supply Code and other Conditions of Supply ) Regulations 2005

वितरण परवानेधारकाची कृतीची मानके विनियम ३ मधील नियम ३.२

Any failure by the Distribution Licensee to maintain the standards of performance specified in these Regulations shall render the Distribution Licensee liable to payment of compensation to a person claiming such compensation under the provisions of the Act.

परिशिष्ट अ या अधिनियमाच्या सोबत

III :   Where extension of augmentation of distribution mains requires 3 months' standard period and compensation payable Rs. 100/- per week or a part thereof for delay.

येथे प्रामुख्याने नमूद करावेसे वाटते की, वि.प.ने मा. आयोगाचे कृती मानके विनियमातील नियम ११ नुसार भरपाईच्या जबाबदारीतून माफी किंवा सवलत मिळण्यासाठी कुठल्याही प्रकारची कार्यवाही केली नाही. कुठल्याही तक्रारीत अधिनियमात असलेली कारणे मा. विद्युत आयोगाकडे मांडलेचे वि.प.चे म्हणणे या मंचाकडे लेखी/ तोंडी मांडले नाही. वि.प.ला कृती मानके तरतुदींचे पालन करण्यात अपयश आले आहे. या तिन्ही तक्रारीमध्ये चाचणी अहवाल दिल्यापासून ३ महिन्यात वि.प.ने तक्रारदारास विद्युत पुरवठा दिलेला नाही.

त्यामुळे नियम ५ नुसार मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी) विनियम २००५ नियम ४.१ प्रमाणे आलेल्या अर्जानुसार ५.१ क्लॉज बी नुसार डिस्ट्रीब्यूशन लायसेन्सी येथे वितरण कंपनी –

Inspect the premises to which supply is to be given with proper intimation to the applicant व ५.७ नुसार

Distribution Licensee shall sanction and carry out or permit to be carried out the works to give supply to the applicant.

उत्तरामध्ये चाचणी अहवाल दिलेल्या तारखेस मिळाल्याचे मान्य केले. परंतु जागेवर संच मांडणी केलेली नाही, मोटर व मोटर पेटी बसवून चाचणी अहवाल दिल्यानंतर विद्युत पुरवठा देण्यात येईल असे वि.प.चे म्हणणे याचा अर्थ दि. ९.३.२०१० च्या चाचणी अहवालावर कांही कार्यवाही न करता तसेच अंतर्गत कक्षाने दि. २०.३.२०१० च्या आदेशावर कांही कार्यवाही न करता दि. २९.६.२०१० ला मंचासमोर तक्रार दाखल केल्यानंतर आपल्या लेखी अहवालातील कथनास अनुसरुन तक्रार क्र. १४०/२०१० व तक्रार क्र. १४२/२०१० मध्ये दि. १४.७.२०१० च्या संयुक्त तपासणी अहवालाची प्रत जोडली आहे. तक्रार क्र.१४१/२०१० मध्ये संयुक्त तपासणी कधी केली या तारखेचा उल्लेख नाही. अशा परिस्थितीत, संयुक्त तपासणी अहवाल हा नियमाप्रमाणे आहे की नाही याची तपासणी करणे जरुर आहे. श्री. खापरे यांनी मंचास वि.प.चे स्वत:चे पुरवठ्यांच्या अटीचे कोड Based on MERC (Electricity Supply and other conditions of supply) Regulation 2005 मधील 13.1 L.T. consumer s' installation मधील 13.1.1 कडे मंचाचे लक्ष वेधण्यात येत आहे ते असे –

**13.1.1** The MSEDCL shall, after receipt of the Test Report of the consumer's licensed electrical contractor, inform the consumer the date and time when the MSEDCL's authorized representative shall visit the premises of the consumer for inspection and testing of consumer's installation and the consumer shall ensure that the authorized representative of the licensed electrical contractor, qualified and employed by such licensed electrical contractor, remains present at the time of such inspection and testing of the consumer's installation and further provides all such information concerning the installation.

त्या सोबत Annexure C मध्ये नोटीसचा नमुना दिलेला आहे. त्याचा विषय Joint Inspection of premises आहे. वि.प.ने अशा प्रकारची नोटीस तक्रारदार यांस दिली होती का नाही याबद्दल मौंन बाळगले आहे. त्यामुळे अशाप्रकारे वि.प.ने स्वत: च्या सप्लाय कोडींग प्रमाणे पूर्तता केली नसल्याचे दिसते. तसेच अशी संयुक्त तपासणी कृती मानकानुसार मुदत संपून गेल्यानंतर म्हणजे चाचणी अहवाल दिल्यानंतर ३ महिन्यानंतरच्या काळातील व अंतर्गत कक्षाचे आदेश प्राप्त झालेनंतर जवळजवळ ३ महिन्यानंतरची आहे. केवळ लेखी अहवालात बचाव घेण्यासाठी अशा प्रकारचे इन्स्पेक्शनचे कथानक रचल्याचे दिसते.

जरी असे झाले असले तरी, पुरवठ्याच्या अटी कलम १३.१.१ च्या तरतुदीनुसार कार्यवाही नाही, कारण तक्रारदार यांस नोटीस नाही. येथे नमूद करावेसे वाटते की, वि.प.ने तक्रारदार यांनी दिलेल्या चाचणी अहवालाची नोंद घेतली आहे. लेखी कथनात प्रतिनिधी यांनी उल्लेख केलेले पत्र म्हणजेच प्रत्येक प्रकरणात मंचाकडे दिलेला लेखी अहवाल किंवा तक्रारीस उत्तर, कारण त्याचा नंबर ५१८१, ५१८२ व ५१८३ असा तिन्ही तक्रारीत अनुक्रमे आहे. त्यामुळे वि.प.ने संयुक्त तपासणी अहवालात तक्रारदारांनी जागेवर संच मांडणी दिसत नाही हे निरीक्षण कांही झालेल्या विलंबाची भरपाई माफ करण्यासाठी संयुक्तिक कारण होवू शकत नाही. त्यामुळे वि.प.स कृती मानकातील तरतुदींची पूर्तता करण्यात अपयश आले आहे, त्यामुळे तक्रारदार यांस भरपाई देणेस वितरण कंपनी बांधील (जबाबदार) आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. अर्थात तक्रारदार यांना वीज जोडणी देतांना तक्रारदार यांनी वि.प.च्या नियमानुसार योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यानंतरच वि.प. तक्रारदारास वीज जोडणी देईल. प्रत्येक तक्रारीमध्ये ३ महिन्याचे मुदतीत म्हणजे दि. ८.६.२०१० पर्यंत विद्युत पुरवठा देणे जरुरी होते तो देण्यात आलेला नाही. त्यामुळे त्या दिवसापासून वीज जोडणी देईपर्यंत प्रति आठवडा रु. १००/– भरपाई मिळण्याचा तक्रारदारास हक्क आहे व वि.प.ची अशी भरपाई देण्याची जबाबदारी आहे, कारण वि.प.कडून कृती मानके विनियमातील तरतुदीचा भंग झाला आहे. खालील आदेश –

## आदेश

१) तक्रार क्र. १४०/१०, १४१/१० व १४२/१० या तिन्ही तक्रारी मंजूर करण्यात येत आहेत.

२) या तिन्ही तक्रारींमध्ये वितरण कंपनीने तक्रारदार यांना त्यांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे वीज जोडणी द्यावी.

३) वितरण कंपनीने तक्रार क्र. १४०, १४१ व १४२ मध्ये दि. ८.६.२०१० पासून वीज जोडणी देईपर्यंतच्या कालावधीसाठी भरपाई प्रति आठवडा रु. १००/–या तक्रारदार यांना द्यावी.

४) सदर रकमेचे २ बिलींग सायकलमध्ये समायोजन करण्यात यावे.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )

अध्यक्ष